**सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व**
**विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.१०८/मावक**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ११ जुलै, २०१९.**

वाचा :- १) सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ , दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८.
२) सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०७ , दिनांक ३ जुलै, २०१९.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१, दिनांक २५ जून, २०१९.

**प्रस्तावना:**

वाचा क्र. १ येथे नमूद दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजीच्या अधिनियमाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग नव्याने घोषित करण्यात आला असून त्यामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे.

वाचा क्र.२ येथे नमूद सन २०१९ चा अधिनियम क्र. ७ दि. ३ जुलै, २०१९ अन्वये वाचा क्र. १ येथे नमूद अधिनियमातील कलम ४ क येथे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी विनिर्दिष्ट आरक्षण १२ % तर कलम ४ ख येथे विनिर्दिष्ट आरक्षण १३ % एवढे विहित करण्यात आले आहे.

वाचा क्र. ३ येथे नमूद सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. २५ जुन २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्ग कल्याण हे विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

मा. मंत्री महसुल तथा अध्यक्ष मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करणेबाबत दि. २६.६.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर योजना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या

मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने खालीलप्रमाणे शासननिर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दि. २५.६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण व SEBC प्रवर्ग कल्याण हा विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडे सोपविण्यात आलेला आहे. SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) लागू करण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यास (उदाहरणार्थ मा. मंत्रीमंडळाची मान्यता/लेखाशिर्ष/शासन निर्णय/अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध करुन घेणे इ.) किमान ६ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. ही बाब तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील अपुरे मनुष्यबळ, आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने लागू होणाऱ्या आदर्श आचारसंहितेमुळे विभागाकडे उपलब्ध होणारा अल्प कालावधी विचारात घेऊन SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा पहिला हप्ता संबंधित प्रशासकीय विभागानी सदर दोन्ही योजनांसाठी कार्यान्वित लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या वित्तीय तरतुदीतून अदा करावा.

३. उक्त नमूद दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा दुसरा हप्ता अदा करण्याच्या कालावधीपर्यंत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची याबाबत आवश्यकती प्रशासकीय कार्यवाही पुर्ण झाली तरच शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता देण्याची कार्यवाही विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत करण्यात येईल.

४. त्याचप्रमाणे सदर दोन्ही योजनांचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यासाठी आजमितीस जी यंत्रणा व कार्यपध्दती, शासननिर्णय, पात्रतेच्या अटी शर्ती अस्तित्वात आहे त्यात कोणताही बदल न करता प्रचलित यंत्रणा व कार्यपध्दतीद्वारे राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्यात यावा.

५. महाडिबीटी पोर्टलवर राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही देखील उच्च प्राधान्याने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संगणक साकेतांक क्रमांक २०१९०७१११२१६५००१२२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Vithalrao Weladi

Digitally signed by Vijay Vithalrao Weladi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c33d11360090dc60a00f603b2d1b16bd83f0256338774a947f737fede7af039, serialNumber=1e395c154c970776fc5115641f8d6663d6a765cfcf30c8d1f594706468740b6d, cn=Vijay Vithalrao Weladi
Date: 2019.07.11 13:24:10 +05'30'

(वि.वि.वेलादी)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मंत्री/मा. राज्यमंत्री, (सर्व) मंत्रालय, मुंबई.मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११.प्रधान सचिव (पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय) विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
१४.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१६.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई

१७.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई
२०.संचालक, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
२१.सर्व विभागीय आयुक्त
२२.सर्व जिल्हाधिकारी
आपण सदर योजना सर्व संबंधित विभागांकडून काटेकोरपणे राबविल्या जाईल यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी.
२३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२४.समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२५.अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जातपडताळणी समिती (सर्व)
२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२७.सर्व उपविभागीय अधिकारी (महसुल) तथा उपविभागीय दंडाधिकारी
२८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी
२९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई
३०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा , मुंबई
३१.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- नागपूर
३२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- नागपूर
३३.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३४.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३७. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३८. संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३९.संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४०.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
४१.व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे
४२.मंत्री, (महसूल), महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४३.मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

GEN. HOSPITALS
PUNE - 1.
No. 225
DATE 3/3/11

शासकीय व शासन अनुदानित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्काचे दर सुधारीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र.एएमसी-१००७/६२८/प्र.क्र.१४८/०७/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ मार्च, २०११

वाचा:- शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभा क्रमांक एमईडी-१००३/सीआर-२०८/०३/शिक्षण-२, दिनांक ६.९.२००३

प्रस्तावना: उपरोक्त शासन निर्णयाद्वारे शासन व शासन अनुदानित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील शैक्षणिक शुल्काचे दर निश्चित करण्यात आले होते. सन २००३-०४ ते २००५-०६ या कालावधीत प्रत्येक वर्षासाठी (१२ महिन्यांसाठी) आरोग्य विज्ञानाच्या विविध शाखांमधील पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्काच्या दराचे पुनर्विलोकन करुन ते सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: शासकीय तसेच शासन अनुदानित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील विद्यमान शैक्षणिक शुल्क हे खाजगी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांच्या तुलनेत फारच कमी आहे. शासकीय महाविद्यालये तसेच संलग्नित रुग्णालयांसाठी शासनास बराच आर्थिक भार सोसावा लागतो. त्यामुळे प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक शुल्काच्या दरात सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. याबाबत साकल्याने विचार करुन शासन तसेच शासन अनुदानित संस्थांमधील महाविद्यालयात पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सन २०११-१२ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क आकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| अ.क्र. | विद्याशाखेचे नांव | प्रतिवर्ष शैक्षणिक शुल्क + विकास निधी (रुपयांमध्ये) |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय | ४०,००० + ५,००० |
| २. | दंत | ३०,००० + ३,००० |
| ३. | आयुर्वेद | १५,००० + ३,००० |
| ४. | युनानी | १५,००० + ३,००० |
| ५. | भौतिकोपचार व व्यवसायोपचार | १५,००० + ३,००० |
| ६. | डी.एम.एल.टी. | १८,००० + निरंक |
| ७. | परिचर्या | ६,००० + निरंक |
| ८. | बी.पी.एम.टी. | १८,००० + निरंक |

वरील शुल्क सन २०११-१२ पासून लागू करण्यात येत असून सन २०१२-१ पासून त्यापुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षी सदर शैक्षणिक शुल्कात १० टक्के एवढी वाढ पुढी

Increase in Fee1/-

B. J. MEDICAL COLLEGE PUNE
No 245

पा

(३) ... निश्चित होईपर्यंत करण्यात येईल. शैक्षणिक शुल्कात १० टक्के वाढ करण्यात त्यानंतर, आवश्यक असल्यास, येणाऱ्या रकमचे रुपांतर रु.१००/-च्या पटीतील ळच्या रकमेत पूर्णांकीत करण्यात येईल व तेवढे शुल्क आकारण्यात येईल.

विद्यार्थी प्रवेशित होताना आकारण्यात आलेले शैक्षणिक शुल्क त्याचा/तिचा यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू राहील.

वरील शैक्षणिक शुल्काशिवाय इतर संकीर्ण शुल्कात खालीलप्रमाणे वाढ करण्यात असून सदर वाढ सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून लागू राहील.

| क्र. | बाब | विद्यमान शुल्क (रुपये) | प्रस्तावित शुल्क (रुपये) | शुल्काचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | प्रवेश शुल्क | १००० | १,५०० | प्रथमवर्षात प्रवेश घेताना |
| | जिमखाना शुल्क | ५०० | ५०० | प्रतिवर्षी |
| | वसतिगृह | २००० | ४००० | प्रतिवर्षी |

वरील शुल्क वाढीशिवाय खालीलप्रमाणे अतिरिक्त शुल्क सन २०११-१२ या क्षणिक वर्षापासून आकारण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | शुल्क (रुपये) | शुल्काचे स्वरुप |
|---|---|---|---|
| . | ग्रंथालय अनामत | २००० | प्रथम वर्षात प्रवेश घेताना एकावेळी, (अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर परतावा योग्य) |
| . | ग्रंथालय शुल्क | १००० | प्रतिवर्षी |

सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापूर्वी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून पूर्वीच्याच दराने शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे. तसेच विकास निधी, प्रवेश फी, जिमखाना फी, वसतीगृह फी, ग्रंथालय अनामत रक्कम व अतिरिक्त शुल्क, इत्यादी संबंधित अधिष्ठातांच्या नांवे असलेल्या महाविद्यालयाच्या स्वीय प्रपंची खात्यात (पीएलए) जमा करण्यात यावे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४०४/२०१०/ -१३, दि. १ जुलै, २०१० च्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र. २०११०३०१२०४७४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-

(मिलिंद म्हैसकर)
सचिव, महाराष्ट्र शासन

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

...Fee2/-

**उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात रक्कम थेट जमा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१७.

**वाचा :-** (१) महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.
(२) शासन अधिसूचना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक:स्कॅालर-४९१७/ प्र.क्र.१४६/मशि-२, दिनांक२९.०६.२०१७.

**प्रस्तावना :-**

गुणवान व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या काही शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

२. संदर्भाधिन क्र. १ येथील महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मध्ये शासनाकडून देण्यात येणारे कोणतेही आर्थिक सहाय्य, लाभ व सेवांच्या प्रयोजनार्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करून त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात वित्तीय लाभाची रक्कम थेट जमा करण्याची तरतूद केली आहे. सदर अधिनियमातील कलम ३ व ४ मधील तरतुदीनुसार संदर्भाधीन क्र.२ येथील अधिसूचनेन्वये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची सूची व सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी ओळख सिद्ध करण्याच्या प्रयोजनार्थ ओळखीचे अधिप्रमाणन किंवा पुरावा अधिसूचीत केले आहेत. त्यानुसार अधिसूचीत केलेल्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांचा लाभ देण्याच्या प्रयोजनार्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करून, त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात वित्तीय लाभाची रक्कम थेट जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तरी संदर्भाधीन क्रमांक २ येथील अधिसूचनेमध्ये अधिसूचित केलेल्या शिष्यवृत्ती/ आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी लाभाची रक्कम ही थेट लाभार्थ्यांस त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात शासनाकडून जमा करण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन क्रमांक १ येथील महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मधील तरतूदी व संदर्भाधीन क्रमांक २ येथील

अधिसूचना विचारात घेवून, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील **परिशिष्ट "अ"** मधील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम संबंधित महाविद्यालयांना देण्याऐवजी, पात्र लाभार्थ्यांस थेट त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात यावी.

२. प्रस्तुत शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वय अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राहतील. तसेच, सहाय्यक संचालक (लेखा), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम पात्र लाभार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे :-

(१) **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केलेल्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती व निकष लागू राहतील.

(२) अर्जदार विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेसंदर्भातील ऑन-लाईन अर्जासोबत त्यांच्या आधार क्रमांकाबरोबरच आधार संलग्नित बचत बँक खात्याचा तपशिल द्यावा. संबंधित शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/विद्यापीठे/सक्षम प्राधिकारी यांनी सदर योजनेसंबंधीच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करावी व DBT पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

(३) शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालयांनी प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित करताना त्यांचा आधार क्रमांक हा संबंधित शैक्षणिक संस्था/विद्यापीठ/महविद्यालयाच्या सांकेतिक क्रमांकाशी (Unique Number) (AISHE Code अथवा शैक्षणिक संस्था/ विद्यापीठ/महाविद्यालयाने दिलेला नोंदणीकृत क्रमांक) जोडून त्याआधारे विकसित केलेली विद्यार्थ्यांची परिपूर्ण माहीती (Data Base) ही प्रस्तावित DBT पोर्टलशी जोडण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपलब्ध करुन द्यावी.

(४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रत्येक योजनेकरिता राष्ट्रीयकृत बँकेत एक संयुक्त खाते उघडून त्याद्वारे लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती राज्यस्तरीय DBT पोर्टल मार्फत अदा करण्याची कार्यवाही करावी. वर नमूद खात्याव्यतिरिक्त इतर कोणतेही खाते जिल्हा/तालुका/विभागस्तरावर ठेवण्यात येऊ नये.

(५) उच्च शिक्षण संचालनालयाने शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेची माहिती महाविद्यालयाच्या सांकेतिक क्रमांकासह (Unique Number) विद्यापीठ/

महाविद्यालयाचा नोंदणीकृत क्रमांक (AISHE) DBT पोर्टलला जोडण्याची कार्यवाही करावी.

(६) सदर प्रयोजनार्थ माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून केंद्रीभूत थेट लाभ हस्तांतरण पोर्टल विकसित करण्यात येत असून, यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेसंदर्भातील अर्ज करण्यापासून शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्याची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेसाठी राज्यस्तरीय DBT पोर्टलचा वापर करणे अनिवार्य राहिल.

(७) पात्र लाभार्थ्यांनी त्यांचा आधार क्रमांक हा ऑन-लाईन अर्जासोबत देणे आवश्यक असेल. तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त करुन घ्यावयाची आहे, असे खाते ऑन-लाईन अर्जासोबत दिलेल्या आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करुन घ्यावी.

(८) उक्त योजनेअंतर्गत सध्या लाभ घेत असलेले व नवीन लाभार्थी विद्यार्थ्यांना यापुढे राज्यस्तरीय DBT पोर्टलवर नव्याने अर्ज करणे अनिवार्य राहिल. या योजनांतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्याची रक्कम अदा करतेवेळी लाभार्थी विद्यार्थी, अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/विद्यापीठनिहाय सविस्तर यादी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल. तसेच सदर यादी उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०८०२१६१६१४४४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.08.02 16:18:20 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

४. मा.राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) मंत्रालय, मुंबई,
१०. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (सदर शासन निर्णय सर्व शैक्षणिक संस्था/ सर्व महाविद्यालये/ सर्व विद्यापीठे यांच्या निदर्शनास आणण्यात यावा.)
१५. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
१६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२२. उपसचिव (मशि/विशि/तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
२३. कक्ष अधिकारी, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
२४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक,
२५. निवड नस्ती मशि-२.

## परिशिष्ट "अ"

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| १ | हिंदी मधील मॅट्रिकोत्तर अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| २ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| ३ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ४ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| ५ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ६ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य |
| ७ | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ८ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ९ | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

राज्यशासनाच्या शिष्यवृत्या
दरात सुधारणा..

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एससीएच २००३/(४०५/०३)/मशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५फेब्रुवारी,२००४

पहा :- १) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच १०६५-यू, २९ सप्टेंबर, १९६५.
२) शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच १४७०/१०७५७२/ एस, दिनांक १४ मे, १९७१.
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०८२/ ४१९९/ विशि-३, दि. १३ ऑगस्ट,१९८५.
४) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०८५/ ५०६२००/ (२६५१) दि. २१ ऑक्टोबर,१९८५.
५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. विपस-१०९३/ ६५५२७(८०)/ मशि-४, दि. १ जुलै,१९९४.
६) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं / शिष्य/ योजना / बदल /१४-अई , दिनांक २४ जुलै,२००३.
७) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ.१९-१/२००२(SA-I/ Policy), दिनांक ५-२-२००३.
८) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं / शासंअछा/येलेरे / बदल /१४-अई /१४१९, दिनांक २७ जानेवारी,२००४.

## शासन निर्णय

उच्च शिक्षणाच्या अंतर्गत असणा-या विविध शिष्यवृत्त्यांच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता या निर्णयाद्वारे राज्य शासनाच्या खालील शिष्यवृत्त्यांच्या दरात त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यास मंजूरी देत आहे :-

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | संच | सध्याचे दर | सुधारित दर २००३-०४ पासून |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | १४ | रू. ४००/-दरमहा + रू. ५०/- दरमहा सादिलवार खर्च | रू. ७५०/- दरमहा +रू.१०००/- वार्षिक सादिलवार खर्च |
| २ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १२०८ | रू.३५/-दरमहा | रू.१००/-दरमहा |
| ३. | राज्यशासनाची दक्षिणाअधिछात्रवृत्ती | ७६ | रू. ६०/- दरमहा | रू. २५०/- दरमहा |
| ४. | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती. | १०० | रू.४०/-दरमहा | रू.१००/-दरमहा |
| ५. | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली.. शिष्यवृत्ती | १ | रू. ५०००/-दरमहा + रू. ५०००/- वार्षिक सादिलवार खर्च | रू. ८०००/-दरमहा + रू. १००००/- वार्षिक सादिलवार खर्च |

२ याबरोबरच एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेसाठी असलेली उत्पन्नाची मर्यादा रू.३५,०००/- ऐवजी रू. ७५,०००/- करण्यास व गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता वरिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत नुतनीकरणासाठी किमान ६५% गुण व कनिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत नुतनीकरणासाठी किमान ५५% गुण आवश्यक करण्यास याद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

३. यावर होणारा खर्च " २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण"या प्रधान शीर्षाखाली व संबंधीत उपशीर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय २००३-०४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत प्रधान सचिव,वित्त यांच्याकडे दिनांक १६.१.२००३ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. द. पडवळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व सह संचालक, उच्च शिक्षण, प्रादेशिक विभाग.
महालेखापाल (लेखा परीक्षा )-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर .
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई .
कोषाधिकारी, पुणे.
नियोजन विभाग / वित्त विभाग.
उच्च व तंत्रशिक्षण विभाग ,कार्यासन-(साशि-१).
निवड नस्ती (गशि-१).

मा. श्री. सु. द. पडवळ, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण, मुंबई.

वैद्यकीय शिक्षण

पुरवणी मागणी

आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्काचे दर निश्चित करण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांक :एमईडी-१४९९/२७०३/प्र.क्र.२६०/९९/शिक्षण-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ५ जानेवारी, २००१

वाचा : १) शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१४९९/प्र.क्र.९३/९९शिक्षण-१, दिनांक १२ मे, १९९९

२) शासन पूरकपत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१४९९/२७०३/प्र.क्र.२६०/९९/शिक्षण-१, दिनांक ३१ डिसेंबर, १९९९

३) शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमआएस-१०९७/९११/प्र.क्र.१७०/९७/शिक्षण-२, दिनांक ४ मार्च, १९९९

**शासन निर्णय :** खाजगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील मुक्त जागा व मुल्याधारित जागांचे वार्षिक शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यासाठी उच्चतम मर्यादा केंद्र शासनाने निर्धारित करावी व त्यांअंतर्गत राज्य शासनाने त्या अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्काचे दर निश्चित करावेत आणि शैक्षणिक शुल्कांच्या दराचे पुनर्विलोकन दर ३ वर्षांनी करण्यात यावे असे मा. न्यायालयाचे निदेश आहेत. त्यानुसार आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्काचे दर निश्चित करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समित्यांचे गठन करण्यात आले होते. त्या समित्यांनी आपला अहवाल शासनास सादर केला. समितीच्या अहवालातील शिफारस व खाजगी वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमाची महाविद्यालये चालविण्यासाठी संस्थांना येणारा खर्च विचारात घेऊन वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या खाजगी महाविद्यालयात मुक्त जागा व मुल्याधारित जागांवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून, किती शुल्क आकारण्यात यावे याबाबतचा राज्य शासनाचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर करण्यात आला आहे. त्याबाबत केंद्र शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. तथापि शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयांमध्ये तसेच शासकीय/अनुदानित व खाजगी आयुर्वेद, युनानी व खाजगी होमिओपॅथी, भौतिकोपचार व व्यवसायोपचार आणि डी.एम.एल.टी. महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून आकारावयाच्या शैक्षणिक शुल्काबाबत समितीच्या शिफारशी विचारात घेऊन खालील प्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालयाचा प्रकार | मुक्त जागा | मुल्याधारित जागा |
|---|---|---|---|---|
| १) | वैद्यकीय | शासकीय | १२,००० | |

(12)

मा. [illegible] कार्य अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण [illegible]

शैक्षणिक
शिक्षण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | दंत | शासकीय | १०,००० | – |
| ३) | भौतिकोपचार व व्यवसायोपचार | खाजगी | ५,००० | २५,००० |
| ४) | डी.एम.एल.टी. | खाजगी | ५,००० | २५,००० |

| अ.क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालयाचा प्रकार | मुक्त जागा | | मुल्याधारित जागा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय/अनुदानित | स्वतःचे रुग्णालय असल्यास | स्वतःचे रुग्णालय नसल्यास | स्वतःचे रुग्णालय असल्यास | स्वतःचे रुग्णालय नसल्यास |
| १) | आयुर्वेद | शासकीय/अनुदानित | ५,००० | – | – | – |
| २) | युनानी | शासकीय/अनुदानित | ५,००० | – | – | – |
| ३) | आयुर्वेद | खाजगी | ७,००० | – | ८०,००० | ६५,००० |
| ४) | होमिओपॅथी | खाजगी | ७,००० | – | ३५,००० | २०,००० |
| ५) | युनानी | खाजगी | ७,००० | – | ३५,००० | २०,००० |

२. वर निर्धारित केलेले शैक्षणिक शुल्काचे दर हे सन २०००-२००१ या वर्षापासून पुढील ३ वर्षासाठी लागू राहतील.

वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये आकारण्यात येणाऱ्या मुक्त जागा व मुल्याधारित जागासाठीचे शैक्षणिक शुल्काचे दर केंद्र शासनने त्याबाबतची उच्चतम मर्यादा निश्चित केल्यानंतर राज्य शासन निर्धारित करील.

३. शैक्षणिक शुल्क वाढीमुळे अनुदानित/आयुर्वेद/युनानी महाविद्यालयांना जेवढे वाढीव शुल्क मिळेल त्या प्रमाणात अनुदान कमी करण्यात यावे.

४. सदरचे आदेश हे वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र ७८१ व्यय-१३/२०००, दिनांक ९.६.२००० अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दत्तात्रय बोऱ्हाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई.
सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासकीय आणि शासन अनुदानित आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील शैक्षणिक शुल्काचे दर निश्चित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक :एमईडी-१००३/सीआर-२०८/०३/शिक्षण-२,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई
दिनांक : ६ सप्टेंबर,२००३

वाचा : शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये क्रमांक :एमईडी-१४९९/२७०३/ प्र.क्र.२६०/९९/शिक्षण-१, दिनांक ५ जानेवारी, २००१

**प्रस्तावना** : शासकीय आणि शासन अनुदानित आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे शैक्षणिक शुल्क या अगोदर उपरोक्त संदर्भाधीन दिनांक ५ जानेवारी, २००१ च्या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आले होते. सदरचे शैक्षणिक शुल्क सन २०००-०१ पासून २००१-२००३ या तीन शैक्षणिक वर्षासाठी निश्चित करण्यात आले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ११ न्यायधिशाच्या खंडपीठाने दिनांक ३१.१०.०२ रोजी टी.एम.ए.पै.फौंडेशन विरुद्ध कर्नाटक शासन प्रकरण क्रमांक ३१७/९३ या प्रकरणात निर्णय दिला आहे. त्यासंबंधात रिट पिटीशन क्रमांक ३५०/९३ (इस्लामिक ॲकॅडमीक एज्युकेशन आणि इतर विरुद्ध कर्नाटक शासन व इतर) मध्ये दिनांक १४ ऑगस्ट, २००३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टीकरणात्मक निदेश दिलेले आहेत. त्यानुसार शासकीय व शासन अनुदानित महाविद्यालयातील शैक्षणिक शुल्क शासनाकडून ठरविण्यास पूर्णतः मोकळीक आहे. या बाबी विचारात घेऊन शैक्षणिक शुल्काच्या दराचे पुनर्विलोकन करुन ते सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : या प्रश्नाचा सर्वांगिण विचार करुन शासन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास यांद्वारे मान्यता देत आहे.

(अ) शासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील महाविद्यालयात सन २००३-०४ ते २००५-०६ या कालावधीत आरोग्य विज्ञानाच्या विविध शाखांमधील पदवीपूर्व आणि पदव्यूत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रत्येक वर्षासाठी (१२ महिन्यांसाठी) खालीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे.

| अ.क्र. | विद्याशाखेचे नाव | प्रस्तावित शैक्षणिक शुल्काचा दर रुपये |
|---|---|---|
| १) | वैद्यकीय | १८,०००/- |
| २) | दंत | १५,०००/- |
| ३) | आयुर्वेद | ७,५००/- |
| ४) | युनानी | ७,५००/- |
| ५) | भौतिकोपचार व व्यवसायोपचार | ७,१००/- |
| ६) | डी.एम.एल.टी. | १८,०००/- |
| ७) | परिचर्या | ३,०००/- |

(ब) राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर, येथील नवीन महाविद्यालयातील शैक्षणिक शुल्क मात्र इतर वैद्यकीय महाविद्यालयापेक्षा वेगळे ठरविण्यात आले असून, सदरचे शैक्षणिक शुल्क एक वर्षासाठी (१२ महिन्यांसाठी) रुपये ४०,०००/- प्रति विद्यार्थी याप्रमाणे आकारण्यात यावे.

(क) सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापूर्वी आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून पूर्वीच्याच दराने शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे.

(ड) सन २००३-०४ पासून आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमाच्या सर्व महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक शुल्काशिवाय आकारण्यात येणाऱ्या इतर बाबींकरिता खालील तीन बाबींचे शुल्क पुढीलप्रमाणे घेण्यात यावे :-

| अ.क्र. | बाब | शुल्क |
|---|---|---|
| १) | प्रवेश फी | रुपये १०००/- |
| २) | जिमखाना फी | रुपये ५००/- |
| ३) | वसतीगृह | रुपये २०००/- |

सदरच्या शुल्काची रक्कम संबंधीत अधिष्ठातांच्या नावे असलेल्या स्वीय प्रपंची खात्यात जमा करण्यात यावी.

२. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४४५/०३/व्यय-१३, दिनांक १०.७.०३ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भा.र.गावित)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, महानगरपालिका, मुंबई / आयुक्त, महानगरपालिका, ठाणे
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली
सचिव, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली
सचिव, भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली
सचिव, भारतीय केंद्रिय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली
सचिव, केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली
प्रबंधक, संबंधीत विद्यापीठे
महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
कुल सचिव, महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठ, नाशिक
सर्व संबंधित शासकीय वैद्यकीय / दंत/ आयुर्वेद/ भौतिकोपचार- व्यवसायोपचार महाविद्यालये व रुग्णालये
अधिष्ठाता, वैद्यकीय / दंत महाविद्यालये व रुग्णालये, मुंबई / ठाणे
प्राचार्य / अधिष्ठाता, सर्व शासन अनुदानित/खाजगी वैद्यकीय /दंत/आयुर्वेद/ युनानी/होमिओपॅथी/भौतिकोपचार-व्यवसायोपचार/ऑडीओलॉजी महाविद्यालये
शासकीय अभियोक्ता, ओरिजिनल साईड आणि ॲपिलेट साईड, उच्च न्यायालय, मुंबई/ औरंगाबाद/ नागपूर
महालेखापाल-१/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
मा. मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
सर्व कार्यालयीन कक्ष, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (शिक्षण-२)

५४ ५५२ (१०००-०९-०३)

**शासकीय / अशासकीय अनुदानित व विद्यापीठ संचलित अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क , विकास शुल्क व इतर शुल्क लागू करण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : टीईएम-२००३/(२४९/०३)/तांशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ११ सप्टेंबर, २००३

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टिईएम-३३/२०००/(१५/२०००)/तांशि-१, दि.२० एप्रिल,२०००

२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टिईएम-३३९६/(७६५६)/तांशि-१, दि.१५ मे,२०००

**प्रस्तावना :-** टी. एम. ए. पै फौन्डेशन व इतर विरुध्द कर्नाटक राज्य व इतर याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक :३१७/१९९३ च्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या ११ न्यायाधिशांच्या खंडपीठापुढे सुनावणी होऊन दिनांक ३१ऑक्टोबर, २००२ व ५ न्यायाधिशांच्या खंडपीठापुढे सुनावणी होऊन दि.१४ ऑगस्ट,२००३ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. तसेच याच प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २३ ऑगस्ट,२००३ व दि.२सप्टेंबर,२००३ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी / तांत्रिक पदवी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील शिक्षण शुल्क , विकास शुल्क व इतर शुल्क निर्धारीत करावयाचे होते.

वरील प्रमाणे न्यायालयीन निर्णयास अनुसरुन राज्यातील शासकीय व अनुदानित व्यावसायिक महाविद्यालयातील शिक्षण शुल्क पुनर्रचना करण्या संबंधीचा विभागाचा प्रस्ताव दिनांक २६ ऑगस्ट,२००३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. विभागाच्या सदर प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली असून सदरहू मान्यता लक्षात घेऊन सुधारीत शिक्षण शुल्क , विकास शुल्क व इतर शुल्क लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** शासन आता या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून खालीलप्रमाणे शिक्षण शुल्क , विकास शुल्क व इतर शुल्क लागू करण्यासाठी मंजूरी देत आहे.

| अभ्यासक्रम | | लागू करण्यात यावयाचे शुल्क | | |
|---|---|---|---|---|
| | | शिक्षण शुल्क | विकास शुल्क | इतर शुल्क |
| १) | अभियांत्रिकी पदवी | १५,००० | ५,००० | ४,००० (♦) |

विकास शुल्क व इतर शुल्क हे संस्थेच्या विकासाकरीता संस्थेच्या स्विय प्रपंची लेख्यामध्ये ठेवून घेण्यात येईल. तर शिक्षण शुल्क हे शासकीय कोषागारात जमा केले जाईल.

(♦) इतर शुल्काची गणना पुढीलप्रमाणे राहील. :-

| | | |
|---|---|---|
| १) | जिमखाना फी (आयडेंटीटी कार्ड, मॅगेझीन्स, मेडिकल, इत्यादी) | रु. ५००/- |
| २) | ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट फी | रु. ७५/- |
| ३) | लायब्ररी फी | रु. ७००/- |
| ४) | लायब्ररी ॲण्ड लॅबोरेटरी कौशन मनी डिपॉझिट (परतावा योग्य. एकदाच अदा करण्यात येईल, प्रतिवर्षी नाही.) | रु. ५००/- |
| ५) | इंटरनेट ॲण्ड ई-मेल फॅसिलीटीझ फी | रु. ५००/- |
| ६) | ॲन्युअल सोशल गॅदरींग ॲण्ड अदर कल्चरल ॲक्टिव्हीटी फी | रु. १२५/- |
| ७) | लॅबोरेटरीज फी | रु.१६००/- |
| | एकूण | रु.४०००/- |

वरीलप्रमाणे मान्य शुल्के ज्या प्रयोजनासाठी आकारण्यात आली आहेत त्याच प्रयोजनासाठी वापरण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्या.र.चौरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती
सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये (संचालकांमार्फत )
सर्व अकृषि विद्यापीठे
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर
वित्त विभाग
निवासी लेखाधिकारी, मुंबई
निवड नस्ती तांशि-१

**रत्नागिरी व सिंधुदूर्ग या दोन जिल्हयांसाठी कोकण विभागीय शिक्षण मंडळाची स्थापना करणे व त्यासाठी करावी लागणा-या पदनिर्मितीस मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय,** क्रमांक: एसएससी-२००६/(९५/०६)/उमाशि-२,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :१४ मार्च, २०११.

**संदर्भ:-** मा. मंत्रीमंडळाचे सचिव, मुख्यसचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे दिनांक ८ जुलै, २००९ चे पत्र .

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळांमार्फत राज्यातील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता (इ. १२ वी) घेण्यात येतात. सध्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ), पुणे अंतर्गत मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, नाशिक व लातूर अशी आठ विभागीय शिक्षण मंडळे कार्यरत आहेत.

सदर विभागीय शिक्षण मंडळातील कोल्हापूर विभागीय शिक्षण मंडळातून रत्नागिरी व सिंधुदूर्ग हे दोन जिल्हे वगळून या दोन जिल्हयांसाठी स्वतंत्र कोकण विभागीय शिक्षण मंडळ स्थापन करण्यासंदर्भात विधानमंडळात सन्माननीय सदस्यांकडून वारंवार मागणी करण्यात येत होती. यासंदर्भात विधानमंडळात वेळोवेळी झालेल्या चर्चेस अनुसरून व त्यावर मा. सभापती / मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार तसेच लोकप्रतिनिधींनी व काही शिक्षक संघटनांनी केलेल्या मागणीनुसार या दोन जिल्हयांसाठी स्वतंत्र विभागीय शिक्षण मंडळ स्थापन करण्याची व त्यासाठी पदनिर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विभागीय मंडळाच्या निर्मितीसाठी विहीत केलेले निकष, दरवर्षी विद्यार्थी संख्येत होणारी वाढ व वरील बाब विचारात घेऊन महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ मधिल कलम ३ (२) आणि ३ - अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, कोल्हापूर या विभागीय शिक्षण मंडळातून रत्नागिरी व सिंधुदूर्ग हे दोन जिल्हे वगळून या जिल्हयांसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक

विभागीय शिक्षण मंडळ (कोकण विभागीय शिक्षण मंडळ) स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देत आहे.

२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कोल्हापूर विभागीय शिक्षण मंडळाचे कार्यक्षेत्र व नव्याने स्थापन करण्यात येणा-या कोकण विभागीय शिक्षण मंडळाचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | कोल्हापूर विभागीय शिक्षण मंडळात समाविष्ट असलेले जिल्हे | अ.क्र. | नव्याने स्थापन करण्यात येणा-या कोकण विभागीय शिक्षण मंडळात समाविष्ट करावयाचे जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | १ | रत्नागिरी |
| २ | सातारा | २ | सिंधुदूर्ग |
| ३ | सांगली | | |

३. वरीलप्रमाणे कार्यक्षेत्र दर्शविणारी अधिसुचना तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळाची (कोकण विभागीय शिक्षण मंडळ) स्थापन करण्याची संबंधिची अधिसुचना निर्गमित करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

४. कोकण विभागीय शिक्षण मंडळाचे मुख्यालय **रत्नागिरी** येथे राहील.

५. कोकण विभागीय शिक्षण मंडळासाठी राजपत्रित अधिका-यांची खालील पदे नव्याने निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे:-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | विभागीय अध्यक्ष | १ | रू.१५६००-३९१०० |
| २ | विभागीय सचिव | १ | रू.१५६००-३९१०० |
| ३ | सह सचिव | १ | रू.१५६००-३९१०० |
| ४ | सहाय्यक सचिव | १ | रू.९३००-३४८०० |
| ५ | लेखाधिकारी गट-ब | १ | रू.९३००-३४८०० |
| | **एकूण पदे** | ५ | |

वरील पाच पदांपैकी मंडळ अधिनियमातील तरतूदीनुसार विभागीय अध्यक्ष, विभागीय सचिव, सह सचिव व सहाय्यक सचिव ही पदे महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवेतील प्रशासकीय अधिका-यांमधून तर लेखाधिकारी गट-ब हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे.

६.  कोकण विभागीय शिक्षण मंडळासाठी खालीलप्रमाणे ५३ कर्मचा-यांच्या प्रस्तावित पदांपैकी कोल्हापूर विभागीय शिक्षण मंडळाकडून १५ पदे वर्ग करण्यास, तर १४ पदे पदोन्नतीने व २४ पदे नव्याने व सरळसेवेने भरण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदे ही आकृतीबंधानुसार तपासून भरण्यात यावीत.

| अ. क्र. | पदनाम | मंजुर करावयाची एकूण पदे | कोल्हापूर विभागीय शिक्षण मंडळातून वर्ग करावयाची पदे | नव्याने निर्माण करावयाची पदे | | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पदोन्न-तीने | सरळ-सेवेने | |
| १ | वरिष्ठ अधीक्षक | २ | -- | २ | -- | रू.९३००-३४८०० |
| २ | सहाय्यक अधीक्षक | २ | -- | २ | -- | रू.९३००-३४८०० |
| ३ | पर्यवेक्षक लिपिक | ३ | -- | ३ | -- | रू.९३००-३४८०० |
| ४ | वरिष्ठ लिपिक | ७ | ३ | ४ | -- | रू.५२००-२०२०० |
| ५ | कनिष्ठ लिपिक | २४ | १२ | -- | १२ | रू.५२००-२०२०० |
| ६ | नाईक | १ | -- | १ | -- | रू.४४४०-७४४० |
| ७ | शिपाई | ६ | -- | -- | ६ | रू.४४४०-७४४० |
| ८ | सफाईगार | १ | -- | -- | १ | रू.४४४०-७४४० |
| ९ | माळी | १ | -- | -- | १ | रू.४४४०-७४४० |
| १० | वाहनचालक | २ | -- | -- | २ | रू.५२००-२०२०० |
| ११ | वरिष्ठ लघुलेखक | १ | -- | १ | -- | रू.९३००-३४८०० |
| १२ | लघुटंकलेखक | १ | -- | -- | १ | रू.५२००-२०२०० |
| १३ | कन्सोल ऑपरेटर | १ | -- | १ | -- | रू.९३००-३४८०० |
| १४ | कंट्रोल असिस्टंट | १ | -- | -- | १ | रू.५२००-२०२०० |
| | **एकुण** | **५३** | **१५** | **१४** | **२४** | |

७.  वरील राजपत्रित अधिका-यांच्या वेतन व भत्ते याप्रित्यर्थ येणारा खर्च " शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - मागणी क्रमांक ई - २, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२, माध्यमिक शिक्षण, ००१ संचालन व प्रशासन - ००१ (००) (०१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (२२०२ ०२६ २) या लेखाशिर्षाखाली दाखविण्यात यावा व यासर्व खर्चाची प्रतिपूर्ती राज्यमंडळाने व विभागीय शिक्षण मंडळानी शासनास करावी. तर अराजपत्रित कर्मचा-यांचे वेतन व भत्ते याप्रित्यर्थ येणारा खर्च मंडळाकडे जमा होणा-या रक्कमेतून भागवावा.

८. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे व शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरीलप्रमाणे नव्याने निर्माण केलेली राजपत्रित अधिका-यांची व अराजपत्रित कर्मचा-यांची पदे भरण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

९. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक अर्थसं - ५९१० / (१०४/१०) / अर्थसंकल्प, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ अन्वये २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२-माध्यमिक शिक्षण, ००१-संचालन व प्रशासन, (००) (०२) नवीन विभागीय कोकण शिक्षण मंडळाची स्थापना करणे (२२०२H५७२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर ) या लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेली तरतूद मंडळाचा प्राथमिक खर्च भागविण्याकरिता (फर्निचर व साधान सामग्री खरेदी, वाहन खरेदी व इमारत बांधकाम) करण्यात यावा व त्याबाबतचा प्रतिपूर्ती अहवाल शासनास सादर करावा.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०३१४१७२२८६१०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सं.पु.खोरगडे

**(सं.पु.खोरगडे)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**
मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
मा.मंत्री ( शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.राज्यमंत्री ( शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजी नगर, पुणे,
शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य,पुणे,
सर्व विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
महालेखापाल, महाराष्ट्र-१/ २, मुंबई/ नागपूर,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवड नस्ती (उमाशि-२).

माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा यामध्ये गुणवत्ता यादीत वरच्या क्रमांकाने स्थान मिळविणा-या विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्ये देण्याची योजना.....

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय, क्रमांक: एफईडी १०८३/१८१६३५[२३१७]सा शि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- १७ मे, १९८४.

शासन निर्णय:- माध्यमिक शाळा प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा यामध्ये वरचा क्रमांक मिळविणा-या गुणवान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेस आर्थिक अडचणीमुळे बाधा पोहोचू नये म्हणून आणि त्यांची गुणवत्ता वाढविणे शक्य व्हावे व त्यायोगे त्यांच्या बुध्दिमत्तेचा फायदा समाजास व राज्यास करुन घेता यावा, या उद्देशाने अशा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत साकल्याने विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, मार्च १९८४ मध्ये झालेल्या व त्यानंतर यापुढे दरवर्षी मार्च, एप्रिल मध्ये होणा-या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा यामध्ये वरचा क्रमांक मिळविणा-या गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्याची योजना १९८४-८५ च्या शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित करण्यात यावी. या निर्णयानुसार शासन खालील योजनेस मंजुरी देत आहे.

१. गुणवान विद्यार्थ्यांची निवड:- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर व औरंगाबाद या तीन विभागातील परीक्षेत गुणवान विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी खालील प्रमाणे निवड करण्यात यावी.

[एक] माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा:-

| | |
|---|---|
| १] सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधून पहिले पांच विद्यार्थी | ५ |
| २] गुणवत्तेनुसार पहिल्या तीन मुली | ३ |
| ३] गुणवत्तेनुसार मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले तीन विद्यार्थी | ३ |
| प्रत्येक विभागात एकूण | ११ |
| तीन विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या | ३३ |

...२.

[दोन] उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा:-

| | | |
|---|---|---|
| १] सर्व साधारण गुणवत्ता यादीमधून पहिले पांच विद्यार्थी | ५ |
| २] गुणवत्तेनुसार पहिल्या दोन मुली | २ |
| ३] मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले दोन विद्यार्थी | २ |
| ४] विज्ञान विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी | २ |
| ५] कला विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी | २ |
| ६] वाणिज्य विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी | २ |
| प्रत्येक विभागात एकूण | १५ |

तीन विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ४५

टीप:-

[१] वरील दोन परीक्षांत सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील पहिल्या पाच विद्यार्थ्यांमध्ये कांही मुली व मागासवर्गीय विद्यार्थी आले तर त्यांच्या व्यतिरिक्त मुली/मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ठरवून दिलेल्या स्वतंत्र जागांसाठी गुणवत्तेनुसार अन्य विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

[२] विज्ञान, कला व वाणिज्य या विद्याशाखांतील पहिल्या दोन विद्यार्थ्यांपैकी जेवढे विद्यार्थी सर्वसाधारण गुणवत्ता यादीत येतील त्यांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील विद्यार्थी म्हणून गणण्यात येईल व त्यांच्या ऐवजी संबंधित विद्याशाखेतील आणखी विद्यार्थ्यांची निवड केली जाणार नाही. उदा. सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील पहिल्या पाच विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विद्याशाखेतील एक विद्यार्थी असेल तर विज्ञान विद्याशाखेच्या यादीत दोन ऐवजी एक विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. जर सर्वसाधारण गुणवत्ता यादीत विज्ञान विद्याशाखेतील दोन किंवा अधिक विद्यार्थी असतील तर त्या शाखेच्या यादीत आणखी कोणा विद्यार्थ्यांची निवड [illegible]ी जाणार नाही.

२. योजनेखाली गुण[illegible]ना द्यावयाचे आर्थिक सहाय्य:-

[१] शासन मान्य व अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये/महाविद्यालये यामध्ये मान्य दराने आकारल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या फीची प्रतीपूर्ती, यात प्रवेश फी, सत्र फी, शिक्षण फी, ग्रंथालय फी, प्रयोग शाळा फी, जिमखाना फी व परीक्षा फी यांचा समावेश आहे. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अभियांत्रिकी/वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी/वैद्यकीय महाविद्यालय,

तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणा-या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात यावी.

[२] उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ/तांत्रिक परीक्षा मंडळ/विद्यापीठ यांनी आकारलेल्या परीक्षा फीची प्रतिपूर्ती.

[३] वसतीगृहात प्रवेश घेतल्यास वसतीगृह फी प्रत्येक सत्रासाठी रु.३००/- पर्यन्त.

[४] भोजन खर्च दरमहा रु. १५०/- सर्व विद्यार्थ्यांसाठी.

[५] वैद्यकीय खर्च-प्रत्यक्ष खर्च किंवा वार्षिक रु. १२०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम.

[६] पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य यासाठी सहाय्य खाली दर्शविल्याप्रमाणे:-

| अभ्यासक्रम | वार्षिक रक्कम [रुपये] |
|---|---|
| १] कनिष्ठ महाविद्यालये | ३०० |
| २] महाविद्यालये[विज्ञान व्यतिरिक्त] | ५०० |
| ३] विज्ञान, शेतकी, पशु, वैद्यकीय महाविद्यालये | ७०० |
| ४] पदविका अभ्यासक्रम | ५०० |
| ५] वैद्यकीय /अभियांत्रिकी महाविद्यालये | १००० |

३. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी तसेच तो दरवर्षी पुढे चालू ठेवण्यासाठी विहित केलेले नियम:-

[१] या योजनेखाली मदतीस पात्र होण्यासाठी पालकांच्या उत्पन्नाची अट नाही.

[२] विद्यार्थ्याने जो अभ्यासक्रम घेतला असेल तो त्याने किमान त्या अभ्यासक्रमाच्या प्रथम पदवी/पदवीका पर्यन्त पूर्ण केला पाहिजे. मध्येच अभ्यासक्रम सोडून दिल्यास पूर्वी दिलेली सर्व रक्कम त्याचेकडून/पालकांकडून वसूल करण्यात येईल.

[३] एकदा निवडलेल्या अभ्यासक्रमात बदल करावयाचा असल्यास त्यासाठी विद्यार्थ्याने शिक्षण संचालकांची पूर्व संमती घेणे आवश्यक आहे. पूर्व परवानगी शिवाय अभ्यासक्रमात बदल केल्यास या योजनेखाली मिळणारी मदत बंद होईल.

[४] एका अभ्यासक्रमासाठी ज्या कालावधीसाठी मदत मिळाली आहे तेवढ्या कालावधीसाठी पूर्व परवानगीने बदल केलेल्या अभ्यासक्रमासाठी मदत मिळणार नाही.

[५] विविध शुल्कांची [फीची] प्रतीपूर्ती शासनाने किंवा संबंधित विद्यापीठाने मान्य केलेल्या दरानुसार केली जाईल.

[६] या योजनेचा लाभ घेत असताना संबंधित विद्यार्थ्यांना केंद्र अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा अथवा सवलतीचा लाभ घेता येणार नाही. मात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही अट लागू नाही. त्यांना केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या इतर शिष्यवृत्तीचा/अन्य सवलतीचा लाभ घेता येईल. केंद्र/राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती/सवलतीनुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फीची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या योजनेखाली घेवू नये.

[७] मंजूर झालेली मदत खालील अटींची पूर्तता झाल्यास पुढे चालू राहील:-

अ] विद्यार्थ्याने कमीत कमी ७० टक्के गुण प्राप्त केले पाहिजेत व पुढील वर्गात प्रवेश घेतला पाहिजे.

ब] वर नमूद केलेली सवलत फक्त एका अभ्यासक्रमासाठी फक्त एकदाच मिळू शकेल.

क] विद्यार्थ्यांचे वर्तन, प्रगती समाधानकारक पाहिजे.

ड] एका संस्थेतून दुस-या संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी शिक्षण संचालकांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

इ]*

२. ही योजना शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत राबविण्यात यावी. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा या परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर लगेच गुणवत्ता यादीच्या आधारे वरील योजनेत नमूद केल्याप्रमाणे पात्र असणा-या विद्यार्थ्यांना निवड पत्र पाठवावे. संबंधित विद्यार्थ्यांनी या योजनेचे नियम मान्य असल्याचे संमतीपत्र शिक्षण संचालकांकडे पाठविणे आवश्यक आहे.

३. या योजनेनुसार होणारा खर्च १] कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे बाबत "२७७-शिक्षण-डी-विद्यापीठ पूर्व शिक्षण[डब्ल्यू] शिष्यवृत्त्या[डब्ल्यू][बी] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना[दोन]गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य" व [२] महाविद्यालयात/तंत्रनिकेतनात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांबाबत" २७७-शिक्षण[इ]विद्यापीठीय व इतर उच्च शिक्षण [एजी]शिष्यवृत्त्या [एजी][२] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना[एल]

..५..

* इ] शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एफईडी-१०८४/५१०८५/[९०]/माशि-७ दि. २८ जाने ८५ नुसार "गुणवान विद्यार्थ्यांना ... वर्षी ... आर्थिक सहाय्य ... करण्यात

गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य" या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्यासाठी प्रतिवर्षी मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभाग/वित्त विभाग यांच्याशी विचारविनिमय करून व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २४९/इएक्सपी–५ दिनांक २/२/८४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अ.शं. खारकर

[ अ. शं. खारकर ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे,
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
वैद्यकीय शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे,
सचिव, विभागीय मंडळ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे/नागपूर/औरंगाबाद,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र–१/२, मुंबई/नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग [ इएक्सपी–५]
नियोजन विभाग,
वैद्यकीय शिक्षण विभाग,
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा व पर्यटन विभाग
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई [प्रसिध्दीपत्रक काढून या योजनेस सर्व माध्यमांव्दारे प्रसिध्दी देण्याकरिता]
शिक्षण व सेवायोजन विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल.